महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
गो.म.पा.वि.म.औरंगाबाद

उर्ध्व प्रवरा धरण विभाग ,( घुलेवाडी ) संगमनेर ,जिअहमदनगर.
दुरध्वनी व फॅक्स225732-02425 -
ई -मेल-eeupdd.ghlwdiwrd@maharashtra.gov.in
जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळास कृपया भेट द्या
.wwwwrd.maharashtra.gov.in

जा.क्र. उप्रधवि / प्रशा-2/ 414 /सन-2023 दिनांक:- 8 / 2 / 2023

प्रति,
उपवनसंरक्षक
वनविभाग, अहमदनगर

**विषय:-** निळवंडे धरण अप्पर प्रवरा उजवा कालवा प्रकल्पाकरिता वन (संवर्धन) अधिनियम, 1980 चे कलम 2 अंतर्गत 3.27 हेक्टर वनजमीन वळतीकरण करणेबाबतचा प्रस्ताव

**संदर्भ:-**
1) या कार्यालयाचे पत्र जा.क्र. उप्रधवि/ भुसं / 193/ सन 2022 दि. 28/01/2022
2) आपले कार्यालयाचे पत्र क्रमांक —ब / जमीन / 1241 / सन 2022-23 दि. 07/07/2022
3) जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचे पत्र क्र. RB/ Desk-LND - 4B/629 / 2022 दि. 25/07/2022
4) जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचे पत्र क्र. मह/ कार्या / जमीन 2 अ/ एस.आर./ 32 / 2023 दि. 27/01/2023

विषयांकित प्रकरणी निळवंडे धरण उजवा कालवा प्रकल्पाकरिता वन (संवर्धन) अधिनियम, 1980 चे कलम-2 अंतर्गत 3.27 हेक्टर वनजमीन वळती करणाचा प्रस्ताव संदर्भीय पत्र क्र. 1 अन्वये आपल्या कार्यालयास सादर करण्यात आलेला होता. संदर्भीय पत्र क्र. 2 अन्वये प्रस्तावामध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर प्रकल्प कामी वळती करावयाच्या वनजमिनी एवढे वनेत्तर क्षेत्र वनविभागास उपलब्ध करून देणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक आहे. व वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत च्या प्रस्तावामध्ये असिस्टंट इन्स्पेक्टर जनरल ऑफ गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, मिनिस्ट्री ऑफ इनवॉरमेन्ट अँड फॉरेस्ट (एफसी डिव्हिजन) नवी दिल्ली यांचेकडील पत्र क्र. 11-9 / 98 एफसी (पीटी) दि. 05/07/2013 नुसार संबंधित जिल्हाधिकारी यांचे नवीन विहित नमुन्यातील प्रमाणपत्र प्रस्तावासोबत सादर केलेले नाही असे उपरोक्त संदर्भीय पत्र क्र.2 नुसार या कार्यालयास पूर्तता करणे बाबत कळविले होते. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी यांचेकडे पाठपुरावा करून संदर्भीय पत्र क्र. 3 अन्वये वन (संवर्धन) अधिनियम 1980 नुसार संबंधित जिल्हाधिकारी यांचे नवीन विहित नमुन्यातील प्रमाणपत्र प्राप्त करून घेतले. तसेच संदर्भीय पत्र क्र. 4 अन्वये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर प्रकल्प कामी वळती करावयाच्या वनजमिनी एवढे वनेत्तर क्षेत्र वनविभागास उपलब्ध करून देण्यात आले आहे. तरी दोनही संदर्भीय आदेश सोबत जोडून जमीन वळती करणे बाबतचा प्रस्ताव पाच प्रतीमध्ये पुढील कार्यवाही व मंजुरीस्तव सोबत सविनय सादर करण्यात येत आहे.

हे आपले माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

**सोबत:-** वरीलप्रमाणे प्रस्ताव 5 प्रतीमध्ये

(श्री. प्रमोद माने )
कार्यकारी अभियंता
उर्ध्व प्रवरा धरण विभाग
संगमनेर

आवक-जावक
लिपिक 9/2/23
उपवनसंरक्षक, अहमदनगर